# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ४२ -२३** **दिनांक ०६/०२/२०२३**

## मोटार सायकल चोरी करणाऱ्या गुन्हेगारांना अटक करुन एकुण २,०३,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत.

## आचोळे पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक २३/०१/२०२३ रोजी २३.०० वाजता ते दिनांक २४/०१/२०२३ रोजी चे सुमारास फिर्यादी श्री. भरतकुमार रगाराम पुरोहित, वय ३५ वर्षे, व्यवसाय नोव्हेल्टी, रा. ऋषभ अपार्टमेंट, रुम नं. १०३, क्रिस्टराज हायस्कूलच्या जवळ, एम डी गाळानगर, नालासोपारा पुर्व यांनी त्यांची मोटार सायकल क्र MH 01 A J 8801 ही ते राहत असलेल्या बिल्डिंगच्या समोर असलेल्या मोकळया जागेमध्ये उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक २५/०१/२०२३ रोजी आचोळे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत दिवसेंदिवस मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांमध्ये वाढ होत असल्याने सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व उघडकीस न आलेले दाखल गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने तपास करीत असताना गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना दिनांक २६/०१/२०२३ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या अनुषंगाने नमूद पथकाने सापळा रचून मोटार सायकल विक्री करण्याकरीता आलेल्या १) सलाउद्दीन सलिम खान, वय २२ वर्षे, व्यावसाय भंगार विक्री, रा. दोन तलावाजवळ, वठार पेट्रोल पंपाजवळ, सतपाळा, नालासोपारा पश्चिम, २) बिपीन दिलीप राय, वय २७ वर्षे, व्यवसाय रिक्षाचालक, रा. रु.नं.०६, रॉयल अपा. नालेश्वर मंदिराजवळ, अलकापुरी, नालासोपारा पुर्व यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत त्यांनी मोटार सायकल क्र MH 01 A J 8801 ही चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमूद गुन्हयात दिनांक २६/०१/२०२३ रोजी अटक करण्यात आली. त्यांनी ३) जिशान अहमद इबरार खान, वय २७ वर्षे, व्यवसाय भंगार खरेदी, विक्री, रा. रु. नं. सी/३०३, डायमंड, बुऱ्हान चौक, जावेद मेडीकलचे बाजुला, समेळ पाडा, नालासोपारा प. या भंगार व्यवसायिकास विक्री केल्याचे सांगितल्याने त्यास दिनांक २९/०१/२०२३ रोजी अटक करण्यात येवून त्याच्याकडे केलेल्या तपासात आरोपी नामे ४) अविनाश नानकचंद वाल्मीकी, वय ३० वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, रु नं १०२, गणेश अपार्टमेंट, बिल्डींग नं. ९, कारगील नगर, मनवेलपाडा, विरार पश्चिम विक्री याचे टेम्पोचा वापर केल्याचे निष्पन्न झालेने त्यास नमूद गुन्हयात दिनांक ०१/०२/२०२३ रोजी अटक करुन त्यांच्याकडून खालीलप्रमाणे गुन्हयात चोरी गेलेली मोटार सायकल, तसेच गु.र.क्र. २८/२०२३ व गु.र.क्र. ५०/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ मधील

सायकली, गुन्हा करण्याकरीता वापरलेला मोटार टेम्पो असा एकूण २,०३,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. नमूद आरोपीतांकडून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

उघडकीस आलेले गुन्हे

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे पोलीस ठाणे. | गु.र.नं. ४८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे, |
| २. | आचोळे पोलीस ठाणे. | गु.र.नं. २८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे, |
| ३. | आचोळे पोलीस ठाणे. | गु.रं.नं. ५०/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे, |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३, अतिरीक्त कार्यभार परिमंडळ २, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. चंद्रकांत सरोदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, पो.नि. सुधिर गवळी, (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. यशपाल सुर्यवंशी, पो.उ.नि. सुहास म्हात्रे, स.फौ. राजेश काळपुंड, पो.हवा. दत्तात्रय दाईगडे, डी.एस. पाटील, सतिष चव्हाण, पो.अं. विनायक कचरे यांनी केलेली आहे.

---ooo---